**CNR NO- MHSO060007932021**

**नियमित दिवाणी दावा क्र.६१/२०२१**

महेश साठे

**वि.**

**रंजन डोंबे व इतर.**

## नि. १०६ वरील आदेश

## (घोषित दि. १५/०१/२०२४)

०१] प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दाखल करण्यात आलेला असून नि.क्र. ९७ च्या अर्जाला झालेला 'विना म्हणणे' चालविण्याबाबतचा आदेश रद्द करण्याची व दाखल केलेले म्हणणे स्वीकारण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०२] प्रतिवादीतर्फे सदर अर्जास प्रखर विरोध करुन असे नमूद करण्यात आले की, वादीतर्फे जाणिवपुर्वक विलंब करण्यात आलेला आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज खर्जासह नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे. विकल्पेकरुन अर्ज मंजूर करणे झाल्यास जास्तीत जास्त नुकसानभरपाई मंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] प्रतिवादीतर्फे नि.क्र.९७ वर दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ११ प्रमाणे अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. वादीतर्फे वेळोवेळी म्हणणे दाखल करण्याकरीता मुदत घेण्यात आली. दि०८/०१/२०२४ रोजी वादीतर्फे कोणताही अर्ज न आल्यामुळे नि.क्र.९७ चा अर्ज वादीविरुध्द 'विना म्हणणे' चालविण्याचा आदेश पारीत झालेला आहे. निश्चितपणे वादीला पाच मुदती देवूनही वादीने आपले म्हणणे सादर केलेले नाही. म्हणणे सादर करण्याकरीता नेमके काय कारण घडले याबाबत कोणतेही सर्मपक कारण पटलावर आलेले नाही. वादीने मुदत घेवून म्हणणे दाखल न केल्यामुळे दाव्याचे कामकाज लांबलेले आहे. प्रस्तुतचा दावा हा अचल संपत्तीबाबत असून प्रतिवादीने वादीचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ११ च्या तरतुदीनुसार खारीज करण्याची विनंती नि.क्र.९७ व्दारे केलेली आहे. अश्या परिस्थीतीत सदरचा अर्ज गुणदोषांवर चालविणे न्यायोचित असून त्याकरीता वादीला संधी मिळणे गरजेचे आहे. वादीस म्हणणे दाखल करण्याकरीता परवानगी दिल्यास

प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु अशी संधी न मिळाल्यास वादीचे अतोनात नुकसान होणार आहे. त्याचवेळी हे देखील महत्वाचे आहे की वादीने केलेल्या विलंबामुळे प्रतिवादीस नुकसानभरपाई रक्कमेच्या स्वरुपात मंजूर करणे आवश्यक आहे. वरील सर्व विवेचनावरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ अर्ज खर्च रक्कम रु.१,०००/- लावून मंजूर करण्यात येतो.

२ वादीविरुध्द नि. क्र.९७ ला झालेला अर्ज 'विना म्हणणे' चालविण्याबाबतचा आदेश रद्द करण्यात येतो. खर्चाची रक्कम दिल्यानंतर वादीचे म्हणणे पटलावर घेण्यात येते.

सही/-

**दि.१५/०१/२०२४.**

**(अमित अ.खंडाळे)**
**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**पंढरपुर.**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 15.01.2024 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 15.01.2024 |
| Judgment/Order uploaded on | : | 15.01.2024 |